# नागरी सहकारी पतसंस्थांचे लेखापरिक्षण शुल्क बँकांप्रमाणे आवश्यक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या कलम ८१ ते ९० व नियम ६९ ते ७४ व नियम १०८ अंतर्गत सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण, चौकशी निरिक्षण आणि पर्यवेक्षण केले जाते. त्यामध्ये नियम ६९(९) नुसार विविध सहकारी संस्थांना वेगवेगळे ऑडीट दर १५ मे १९९२ सालापासून लागू केलेले आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने क्रेडीट सहकारी संस्था व नॉन क्रेडीट सहकारी संस्था यांचा समावेश होतो. सहकार कायद्याप्रमाणे सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणाच्या शुल्क आकारणीसाठी सहकारी संस्थांचे एकूण ३६ प्रकार पाडलेले आहेत. ज्यामध्ये कोणत्याही सहकारी संस्थेसाठी हिशेब तपासणी फीची मर्यादा नाही. ऑडीट फीचे नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था तसेच शेती पतसंस्था याचा प्रामुख्याने सुध्दा समावेश आहे. या तिन्ही प्रकारच्या भाग व ठेवीच्या रकमा स्विकारणाऱ्या व सभासदांना कर्जाचे वितरण करणाऱ्या सहकारी संस्था यांचे बाबतीत सरकारने देशाचे संविधान हातात घेवून अविचाराने ऑडीट फीचे दर लादलेले आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँका व पतसंस्थांना वेगवेगळे ऑडीट फीचे दर जे लावलेले आहेत ते खालिलप्रमाणे. :-

| **सहकारी संस्थांचा प्रकार** | **ऑडीट फी चे दर<br>खेळत्या भांडवलाच्या तत्वावर** | | |
|---|---|---|---|
| १. नागरी सहकारी बँका | १. रू.१० कोटी पर्यंत | : | ५ नये पैसे शेकडा |
| | २. त्यानंतरच्या रू. ९० कोटी पर्यंत | : | २ नये पैसे शेकडो |
| | ३. त्यानंतर म्हणजे रू.१०० कोटीच्या वर | : | १ नया पैसे शेकडो |
| २. नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था : | १. रू.५ लाखांपर्यंत | : | २५ पैसे शेकडा |
| | २. नंतरच्या रू.५ लाखांवर | : | १५ पैसे शेकडा |
| | ३. नंतरच्या रू.१० लाखांवर | : | १० पैसे शेकडा |
| | ४. रू.१ कोटीच्या वर | : | ५ पैसे शेकडा |
| ३. शेती पतसंस्था : | १. रू. २० लाखापर्यंत | : | २५ पैसे शेकडा |
| | २. नंतरच्या रू. ८० लाखांवर | : | १० पैसे शेकडा |
| | ३. नंतरच्या रू.१ कोटीवर | : | ५ पैसे शेकडा |

वरील तक्त्यावरून सहजपणे लक्षात येते की, नागरी सहकारी बँकांप्रमाणे पतसंस्थांना ऑडीट फी चे दर लावणे आवश्यक होते परंतु अविचाराने राज्यकर्त्यांनी यामध्ये छोट्या सहकारी संस्थांचा घातच केलेला आहे. वास्तविक **ऑडीटर नागरी सहकारी बँकांसाठी वेगळा मेंदू किंवा कालवधी तर पतसंस्थांसाठी वेगळा मेंदू व कालावधी वापरत नाही.** या तिन्ही प्रकारच्या सहकारी संस्थांना ऑडीटसाठी एकच तत्वप्रणाली आहे. मग

असे असताना पतसंस्थांवर म्हणजेच छोट्या कार्यकर्त्यांनी छोट्या लोकांसाठी चालविलेल्या सहकारी संस्था ज्यामध्ये शेतकरी व छोटे - मोठे कामकाज करणारे शहरातील व ग्रामीण भागातिल कार्यकर्ते यांच्या पतसंस्थांना १० पटींपेक्षा जास्त ऑडीट फी आकारणे हे व्यवहारीक नाही. किंबहुना अशी तत्वप्रणाली अंमलात आणणे हे सत्तेचा दुरूपयोग करण्यापेक्षा वेगळे काहीही नाही.

ज्या वेळी अशाप्रकारचे **ऑडीट फीचे दर, भाग / ठेवी स्विकारणाऱ्या व कर्ज देणाऱ्या सहकारी संस्थांना वेगळ्या मापदंडात मोजणे, हे महंम्मद तुघलकीची लक्षणे आहेत.** अनेक आमदार, मंत्री यांनी या ऑडीट फीच्या बाबतीमध्ये नागरी सहकारी बँकाप्रमाणे ऑडीट फी चे दर लागू करण्याची आश्वासने गेली १५ वर्षापासून आम्ही ऐकतो आहे. **परंतू अंमलबजावणी करण्याची नैतिकता एकाही राज्यकर्त्यात शिल्लक राहिलेली नाही.** तसेच ह्याबाबतीत कुणीही गांभिर्याने बघितले नाही. कारण पतसंस्था चालविणारे कार्यकर्ते व त्यातील सभासद यांचेबद्दल लोकप्रतिनिधींच्या मनावर या क्षणापर्यंत काहीही परिणाम झालेला नाही. एवढेच नव्हे तर निती मत्ता सोडून संबंधीतांनी हा विषय दुर्लक्षित केलेला आहे. **वास्तविक नियम ७४(२) नुसार राज्य शासनाला कोणत्याही संस्थेत किंवा संस्थांच्या वर्गास त्याच्यावर आकारणी करण्यात आलेली हिशोब तपासणी विषयक आणि किंवा पर्यवेक्षक विषयक आकार देण्यापासून संपुर्ण किंवा अंशत: सुट देण्यास निबंधकाला प्राधिकृत करता येण्याची तरतुद आहे.** प्रसंगी वेळ पडल्यास राज्याचे विधिमंडळ या सहकार कायद्यात दुरूस्ती करून संविधानाचे रक्षण करू शकते. कारण **संविधानाचे अनुश्चेद क्र. १४ नुसार '' कायद्यापुढे समानता''** याबाबत विश्लेषण केलेले आहे. तसेच **अनुश्चेद क्र. १५ नुसार ''कोणत्याही नागरिकाला प्रतिकुल होईल अशा प्रकारचे भेदभाव करू शकत नाही.''** बाबत विश्लेषण केलेले आहे. संविधानाचा मुलभुत हक्काप्रमाणे **अनुश्चेद क्र. १६ मध्ये सुध्दा '' सार्वजनिक सेवा योजनेच्या बाबींमध्ये समान संधी देण्याची तरतूद केली आहे.''**. आणि अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र शासन सहकार कायद्यामध्ये अशी रचना करून सहकारी पतसंस्थांवर अन्याय करु शकत नाही. व अशा प्रकारची कृती करणे म्हणजे **हा अपहाराचाच दुसरा प्रकार आहे. संविधान परिश्चेद क्र. ३८ (१) व (२)** मध्ये सुध्दा ''लोककल्याणाच्या संवर्धनासाठी, समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी तसेच अनुश्चेद क्र. ३९ (अ) नुसार '' आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीला व उत्पादन साधनांचा संबंध सामुदायिक हितास बाधक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी घेवू नये '' अशी सुध्दा तरतुद आहे.

दिनांक ०६/१०/२०१० रोजी नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्था यांचे ऑडीट कोण करू शकते याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. १२०६ / १९९७ नुसार **शासकीय अनुदान नसलेल्या नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्था आपला वैधानिक लेखापरिक्षकाची स्वत: नेमणूक करू शकतात,** अशा आदेश पारित केलेला आहे. मा. उच्च न्यायालयाचा क्र. ३७८२ /१९९५ च्या ६ ऑक्टोंबर २०१० च्या निर्णयानुसार दिनांक ११/११/१९९६ चे परिपत्रक हे **कलम ८१(१) मधील सहकारी संस्थांना लागू होत नसल्याचा महत्वपुर्ण निकाल दिलेला आहे. थोडक्यात नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थांना शासकीय अनुदान नसल्याने व त्यांचा समावेश नियम ८१(१) मध्ये होत नसल्याने अशा पतसंस्था स्वत: पॅनलवरील लेखापरिक्षक अथवा C. A. (WIRC को - ऑप ऑडीट सर्टीफाईड) कडून घेवू शकतात.** असा मा. उच्च न्यायालयाचा निकाल आहे.

वरील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशावरून लक्षात येते की, शासनाची सहकारी पतसंस्थांवर लेखापरिक्षक

जबरदस्तीने नेमण्याची जी कृती आतापर्यंत चालत आली होती, त्याला सुध्दा मा. उच्च न्यायालयाने रोखले आहे. म्हणजेच शासन, सहकार कायद्यात असलेल्या एखाद्या कलमाचा सोईनुसार अर्थ लावून जनतेवर ज्या पध्दतीने आतापर्यंत आर्थिक अन्याय करत होते. ही बाब अत्यंत्य घृण्णास्पद आहे. आर्थिक समानतेच्या बाबतीत तर संविधानाची पुन्हा पुन्हा चेष्टा केली जात आहे. म्हणून ह्यावेळेस सहकारातील कार्यकर्त्यांनी अत्यंत निष्ठेने, निर्भिडपणे व अभ्यासासह अन्यायाविरूध्द आवाज उठविला पाहिजे. अन्यायाने व सत्ता आणि पैशाच्या जिवावर सोईनुसार कायद्याचा अर्थ लावण्याऱ्यांच्या विरोधात मोठा संघर्ष करून आर्थिक न्याय पदरी पाडला पाहिजे. अन्यथा ही न्याय अन्यायाची दरी जनतेला आणखी भिक्षूक बनवील व तथाकथित जनतेचे कैवारी जनतेच्याच पैशाची कट कारस्थानांनी विल्हेवाट लावतील व आपणास मात्र हे सर्व उघड्या डोळ्यांनी बघत रहावे लागेल, याची सहकारी कार्यकर्त्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**